# दुबईत एप्रिलमध्ये आखाती मराठी उद्योजक परिषद

सकाळ वृत्तसेवा
Thursday, March 11, 2010 AT 09:31 PM (IST)
Tags: gmbf, mahabiz, uae, dubai, business, international

पुणे - दुबईत एप्रिलमध्ये होणाऱ्या पहिल्या आखाती मराठी उद्योजक परिषदेत (महाबिझ) सुमारे अडीचशे उद्योजक सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. 23 आणि 24 एप्रिलला ही परिषद होत आहे. गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमने (जीएमबीएफ) या उपक्रमाचे आयोजन केले आहे. परिषदेचे निमंत्रक आणि "जीएमबीएफ'चे संस्थापक संदीप कडवे यांनी "सकाळ'ला ही माहिती दिली.

आखातातील महाराष्ट्रीय उद्योजकांना एकत्र करणे, त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, आखाती देश व महाराष्ट्र यांच्यातील उद्योग-व्यापाराच्या संधी वाढविणे हा परिषदेचा हेतू असल्याचे श्री. कडवे यांनी सांगितले. संयुक्त अरब अमिरातींमध्ये महाराष्ट्र उद्योग भवन उभारण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

"जीएमबीएफ' गेली सहा वर्षे आखाती प्रदेशात महाराष्ट्रीय उद्योजकांसाठी काम करते आहे. उद्योजकांना आणि गुंतवणूकदारांना योग्य मार्गदर्शन करून व्यापार-उद्योग वाढविण्यासाठी या कामाचा उपयोग होत आहे. "जीएमबीएफ'चे आखाती प्रदेशात नोकरदार वगळता व्यापार, उद्योग क्षेत्रात सुमारे पाच हजार महाराष्ट्रीय कार्यरत आहेत. या सर्व स्रोतांना संघटित केल्यास आखाती देश आणि महाराष्ट्र यांच्यातील उद्योग-व्यापार वाढीसाठी मोठी मदत होईल, असा विश्वास श्री. कडवे यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ऍग्रिकल्चर, इंडियन मर्चंट्स चेंबर, इंडो अरब चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांनी या उपक्रमाला सहकार्य देऊ केले असल्याचे त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र सरकारकडून प्रतिसाद नाही**

महाराष्ट्र सरकारला या उपक्रमाची कल्पना दिलेली आहे. तथापि, सरकारने कोणत्याही स्वरूपाचा प्रतिसाद दिलेला नाही, असे एका प्रश्नावर श्री. कडवे यांनी सांगितले. कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेशची सरकारे आखाती प्रदेशात वेगवेगळे उपक्रम राबवितात. मराठी उद्योजकांनी संघटितपणे उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला, तरी महाराष्ट्र सरकारला त्याची दखल घ्यावीशी वाटत नाही, असे मत त्यांनी मांडले.

**'जीएमबीएफ'चे संस्थापक संदीप कडवे यांनी या परिषदेच्या पार्श्वभूमीवर इ-सकाळला दिलेली मुलाखत वाचण्यासाठी खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करा.**

मराठी उद्यमशीलता आखातात बहरावी : कडवे

संबंधित बातम्या

- मराठी उद्यमशीलता आखातात बहरावी : कडवे
- दुबईत बारा भारतीयांवर खूनप्रकरणी खटला
- एम. एफ. हुसेन यांना हवे परदेशस्थ भारतीय नागरिकत्व
- "दुबई वर्ल्ड'नंतर आता "दुबई होल्डिंग्ज'?
- भारती एअरटेल'च्या सेवेचा विस्तार

ताज्या घडामोडी

- दुबईत एप्रिलमध्ये आखाती मराठी उद्योजक परिषद
- मराठी उद्यमशीलता आखातात बहरावी : कडवे
- नरेंद्र मोदींना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश
- मेखलांच्या कृत्याची आर. आर. पाटीलांकडून दखल
- महिला आरक्षणाचे लोकसभेतही समर्थन - स्वराज
- तहव्वूर राणाचा जामीन फेटाळला

तुमची प्रतिक्रिया लिहा    Login

* Name:    * Email:

* Comment:    (Press Ctrl+g to toggle between English and Marathi)

0/500

powered by Google

अ आ इ ई उ ऊ ए ऐ ऑ ओ औ अं अः
क का कि की कु कू कॅ के कै कॉ को कौ कं कः
क ख ग घ ङ च छ ज झ ञ ट ठ ड ढ
ण त थ द ध न प फ ब भ म य र ल
व श ष स ह ळ क्ष ज्ञ

Submit

आजचा सकाळ...

© Copyrights 2009 eSakal.com - All rights reserved. **Powered By:** **of**